संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

---

## महिला सक्षमीकरण काळाची गरज - कुलगुरु डॉ. मृणालीनी फडणवीस
## महिला सक्षमीकरणावर विद्यापीठात शॉर्टटर्म कोर्सचे उद्‌घाटन संपन्न

अमरावती.

महिला सक्षमीकरण काळाची गरज असून विद्यापीठात आयोजित महिला सक्षमीकरणावरील शॉर्टटर्म कोर्स महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मृणालीनी फडणवीस यांनी केले. विद्यापीठातील यु.जी.सी. मानव संसाधन विकास केंद्राच्यावतीने आयोजित महिला सक्षमीकरणावरील शॉर्टटर्म कोर्सच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, यु.जी.सी. मानव संसाधन विकास केंद्राचे संचालक तथा व्य.प. सदस्य डॉ. प्रसाद वाडेगांवकर, संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. विलास ठाकरे, केंद्राच्या सहसमन्वयक डॉ. वर्षा लोमटे आदी उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. मृणालीनी फडणवीस मार्गदर्शन करतांना म्हणाल्या, तत्कालीन यु.जी.सी. अध्यक्ष देसाई यांनी अशा प्रकारचा अभ्यासक्रम सुरु केला होता. इतर कर्मचाऱ्यांप्रमाणेच महिलांसाठी सुद्धा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे महत्वाचे आहे. सोलापूर विद्यापीठात शिक्षकांप्रमाणेच कर्मचारी कल्याणासाठी विविध उपक्रम व प्रशिक्षण कार्यक्रम राबविले असून त्याचा चांगला फायदा झाला असून विद्यापीठाचे प्रशासन गतीमान झाले आहे.

गेल्या बारा वर्षापासून अशा प्रकारच्या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी माझा पुढाकार राहीला आहे. ई-गव्हर्नन्स, कायद्याचे ज्ञान, नेतृत्वगुण, संशोधन, व्यक्तिमत्व विकास आदी प्रशिक्षण कार्यक्रमांवर माझा भर राहीला आहे, त्याचा फायदा सुद्धा महिलांना झाला आहे. भारतात लोकशाहीने महिलांना समान दर्जा दिला आहे. वरच्या पदावर महिलांचे प्रमाण अत्यल्प आहे, त्यावर जाण्यासाठी महिलांनी जास्तीतजास्त पुढाकार घ्यावा. प्रशिक्षणासाठी वेगवेगळे मोड्युल्स दिले आहेत, त्याची माहिती त्यांनी याप्रसंगी दिली आणि महिलांनी आपले व्यक्तिमत्व सर्वांगीण करावे, असे आवाहन करुन बीजभाषण केले.

अध्यक्षीय स्थानावरुन बोलतांना प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर म्हणाले, देशात महिलांचे प्रमाण पन्नास टक्के आहे. त्यामुळे महिलांचा विकास झाल्यास देशाचा विकास होईल. शिक्षणात मुलींचे प्रमाण सातत्याने वाढत असून गुणवत्तेमध्ये येण्याचे प्रमाणसुद्धा वाढले आहे. महिला सक्षमीकरण फार गरजेचे आहे. अशा प्रकारच्या शॉर्टटर्म कोर्सेसच्या माध्यमातून विद्यापीठाने आयोजित केलेल्या उपक्रमांतून जास्तीतजास्त महिलांचा विकास होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यु.जी.सी. मानव संसाधन विकास केंद्राचे संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर म्हणाले, शिक्षकांना प्रशिक्षण देणे महत्वाचे आहे, कारण त्यांच्या माध्यमातून नवीन पिढी घडते. ती अधिक सक्षम घडावी आणि त्यातून देश विकास साधल्या जावा, हा महत्तम उद्देश अशा प्रकारच्या आयोजनाचा आहे. महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून महिलांचा विकास निश्चितच होईल आणि त्या महिला शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा होईल. संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. विलास ठाकरे यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले.

सुरुवातीला माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शॉल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून कुलगुरु डॉ. मृणालीनी फडणवीस यांचा सत्कार प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांनी केला. याप्रसंगी मान्यवरांचे स्वागत केंद्राच्या सहसमन्वयक डॉ. वर्षा लोमटे यांनी केले. संचालन करीत आभार महिला सक्षमीकरण कोर्सच्या समन्वयक डॉ. स्वाती शेरेकर यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील महिला प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. जवळपास एक आठवडाभर हा कोर्स चालणार आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. ०४/१२/२०१८.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:/University Folder/University News/University News 2018 P.N. 368